महाराष्ट्र शासन

# उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. 402 201
दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: ब/20/जमिन/वसं/1349 /2022-23. दिनांक: 6 /07/2022.

प्रति,

मुख्य प्रबंधक (निर्माण),
गेल (इंडिया) लिमिटेड, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

विषय:-**वन जमिन रायगड**
वन (संवर्धन), अधिनियम 1980 अंतर्गत उरण ते उसर गॅस पाईपलाईन टाकणेकरीता 2.3180 हेक्टर चा वन जमीन मागणीचा प्रस्ताव... गेल (इंडिया) लिमिटेड

संदर्भ:- 1) आपलेकडील पत्र क्र. गेल/युयुपी/अलिबाग/आरडी/फॉरेस्ट/01, दिनांक 13/06/2022.

उपरोक्त संदर्भित पत्रान्वये वन (संवर्धन), अधिनियम 1980 अंतर्गत उरण ते उसर गॅस पाईपलाईन टाकणेकरीता 2.3180 हेक्टर चा वन जमीन मागणीचा प्रस्ताव या कार्यालयास 8 प्रतीत दाखल केला आहे. सदर प्रस्तावांची छाननी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1) प्रस्तावातील क्षेत्र विवरण तक्ता प्रस्तावात Annexure 7 मध्ये सामिल केला आहे परंतु विहीत नमुन्यात सामिल केलेला नाही. तरी खालील प्रमाणे क्षेत्र विवरण तक्ता विहीत नमुन्यात वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्र प्रस्तावात सामिल करणे आवश्यक आहे.

| Item of work/ purpose | Name of village | Forest land required | | | | | Legal Status of Land | Detail of Non-forest land | | | Total area Ha. (7+11) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Survey /Gut no. | Compartment No. | Length x width | Area | | | Survey/ Gut no. | Length x width | Area in Ha. | |
| | | | | | Sq. Meter | Area in Ha. | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| Total:- | | | | | | | | | | | |

2) प्रस्तावांत मालकी क्षेत्रांस खाजगी वा इतर वनाच्या तरतुदी लागू झालेल्या आहेत अगर कसे याबाबत खात्री करणेकरीता त्या क्षेत्राचे जुने फेरफार, जुने/नवीन गावांत रुपांतर झाले असेल तर त्याबाबतचा फेरफार, गट एकत्रिकरण योजना, गट बुक नकाशा इत्यादी माहिती पुर्तता अहवालासोबत देण्यात यावी. जेणेकरुन ज्या क्षेत्राकरीता पाईपलाईन करीता क्षेत्र मागणी करणेत येत आहे. त्याबाबत खात्री करणे शक्य होईल.

3) प्रस्तास्तावात सामिल केलेल्या नकाशामध्ये आखणी मार्गात बाधीत होणारे वनेतर क्षेत्र दर्शविणे आवश्यक आहे. तसेच नकाशा क्षेत्र विवरण तक्क्त्यात वनेतर गाव निहाय व सर्व्हे/हिस्सेनिहाय क्षेत्र दर्शविणे आवश्यक आहे.

4) सदर प्रस्तावांत बाधीत होणा-या क्षेत्राची KML File सादर केलेली नाही. तरी सदर प्रस्तावांत बाधीत होणा-या वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्राची KML File CD मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

5) प्रस्तावात जिल्हाधिकारी यांचेकडील वनहक्क कायदा, 2006 अंतर्गत प्रमाणपत्र सामिल असणे आवश्यक आहे.

6) प्रस्तावांत सदर प्रकल्पाबाबत प्रोजेक्ट नोट प्रकल्प यंत्रणेचे लेटर हेडवर तयार करुन प्रस्तावांत समील करण्यात यावे.

7) प्रस्तावांत पर्यायी तीन मार्ग दर्शविण्यात आलेले आहेत. तथापी त्यामधील प्रस्तावीत मार्ग कोणता हे स्पष्टपणे दर्शविलेले नाहीत.

8) तसेच सदर तीन पर्यायी मार्गांत बाधीत होणारे वनक्षेत्राचा तपशील देऊन निवडण्यात आलेल्या आखणी मार्ग हा का निवडणेत आलेला आहे याबाबत स्पष्टता करणे आवश्यक आहे.

9) टोपाशीट नकाशावर आखणी मार्गापासून नजीकचे अभयारण्याचे व पर्यावरण संवेदनशील (ESZ) क्षेत्राचे अंतर दर्शविलेले आहे. तथापी सदर नकाशा हा 1:50000 या प्रमाणातील नाही.

10) गाव नकाशामध्ये केवळ राखीव वनाचे क्षेत्र दर्शविलेले आहे. इतर वनक्षेत्र जसे खाजगीवन, संरक्षीत वन, अवर्गीकृत वन, अंतीम संपादीत वन, कांदळवन इत्यादी दर्शविले नाही.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन सुधारीत प्रस्ताव आवश्यकत्या दस्तऐवजासह आठ प्रती या कार्यालयास सादर करणेत यावा. सोबत प्रस्तावाचे सर्व संच परत करणेत येत आहेत.

(आशिष ठाकरे, भा.व.से)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- सहा.वनसंरक्षक, पनवेल/अलिबाग व वन परिक्षेत्र अधिकारी, उरण, पनवेल, पेण, वडखळ, अलिबाग यांना माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी.

2/- सदर प्रस्तावात वन परिक्षेत्र अधिकारी, उरण, पनवेल, पेण, वडखळ, अलिबाग यांनी मोका पहाणी करून बाधीत होणारे वनक्षेत्रांत वृक्षतोड होणार आहे अगर कसे याबाबत खात्री करुन जर वृक्षतोड होणार असेल तर बाधीत होणारे वृक्षांचे यादीसह वृक्षतोडीचे अंदाजपत्रक विहीत प्रपत्रात आंग्ल भाषेत भाषांतरीत करुन आठ प्रती अंदाजपत्रक या कार्यालयास सादर करावा. तसेच प्रस्तावांत बाधीत होणारे क्षेत्राचे दुप्पट पर्यायी वनीकरणाकरीता अवनत वनक्षेत्र सुचवून त्याबाबत पॉलीगॉन घेऊन त्याची माहिती या कार्यालयास पर्यायी वनीकरण योजनेसहीत सादर करणेत यावी.

प्रतः वनक्षेत्र सर्व्हेक्षक, विभागीय कार्यालय, अलिबाग यांना माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.